# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक: 01.04.2024** **वार: सोमवार**

---

**सदर्नकमांड**

लष्कराच्या दक्षिण मुख्यालयाचा 130वा वर्धापन दिन आज साजरा होत आहे. यानिमित्त दक्षिण मुख्यालयाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल अजय कुमार सिंग यांनी सर्व अधिकारी, कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांना शुभेच्छा दिल्या आहेत. 1 एप्रिल 1895 रोजी स्थापना झालेल्या लष्कराच्या दक्षिण मुख्यालयानं स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात झालेल्या विविध लष्करी मोहिमांमध्ये सहभाग घेतला आहे. शौर्य, त्याग, निःस्वार्थ सेवेचा गौरवशाली इतिहास सांगणाऱ्या लष्कराच्या दक्षिण मुख्यालयातील युद्ध स्मारकावर आज हुतात्म्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली.

**निलम गोऱ्हे**

देशाचे जबाबदार नागरिक म्हणून आपण मतदानाचा हक्क बजावला पाहिजे. त्यामुळे मतदानाच्या दिवशी कोणीही तीर्थयात्रा किंवा सहलीला न जाता मतदान करा असं आवाहन विधान परिषदेच्या उपसभापती नीलाम गोऱ्हे यांनी पुण्यात केलं. मुळशी इथं आयोजित मतदार मेळाव्यात त्या बोलत होत्या.

**पिंपरी-चिंचवडकर**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर संकलन आणि कर आकारणी विभागानं 2023-24 या आर्थिक वर्षात 977 कोटी 50 लाख रुपयांचा कर वसूल केला आहे. महापालिकेच्या 41 वर्षांच्या इतिहासात प्रथमच जवळपास 1 हजार कोटींपर्यंत कर संकलन झालं आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा कर संकलनात 161 कोटी रुपयांची वाढ झाली आहे.

तर पुणे महापालिका तिजोरीत यंदा 2 हजार 73 कोटी रूपये मिळकत कर जमा झाला आहे. ही रक्कम गेल्या वर्षाच्या जमेपेक्षा 308 कोटी रुपयांनी अधिक आहे.

**ऑटिझमरॅली**

पुण्यातील केईएम रुग्णालयातर्फे आज जागतिक ऑटिझम जागरूकता महिन्यानिमित्त जनजागृती फेरी काढण्यात आली. यामध्ये केईएममधील डॉक्टर आणि कर्मचारी सहभागी झाले होते. दरवर्षी 2 एप्रिल रोजी जागतिक ऑटिझम जागरूकता दिवस आणि संपूर्ण एप्रिल महिना ऑटिझम जागरूकता महिना म्हणून पाळला जातो.

**<u>कर्करोग</u>**

कर्करोग रूग्णांवर होमिओपॅथीद्वारे औषधोपचार गुणकारी ठरतात हे सिध्द झाले आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या होमिओपॅथी विभागाचे अधिष्ठाता डॉ. राजकुमार पाटील यांनी केलं. पिंपरी-चिंचवड इथं विविध संस्थांच्या वतीनं आयोजित राष्ट्रीय परिषदेत ते बोलत होते. या परिषदेला महाराष्ट्रासह देशभरातून विद्यार्थी, डॉक्टर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**<u>आंबा महोत्सव</u>**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समिती आणि राज्य कृषी पणन यांच्या सहकार्याने आजपासून समिती आवारात आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात आलं आहे. उत्पादक ते ग्राहक या संकल्पनेवर आधारित, हा महोत्सव ३१ मे पर्यंत चालणार आहे. यामध्ये राज्यभरातील बचत गटांचे दहा स्टॉल आहेत तर रत्नागिरी, रायगड यासह विविध भागातून येणाऱ्या उत्पादकांचे सव्वाशे स्टॉल आहेत.

**<u>विद्यार्थी सहायक समिती</u>**

विद्यार्थ्यांनी पारंपरिक अभ्यासक्रम न निवडता, आपल्या आवडत्या विषयात करिअर करावं, असा सल्ला ज्येष्ठ अभिनेते राहुल सोलापूरकर यांनी दिला. विद्यार्थी साहाय्यक समितीच्या विद्यार्थी विकास केंद्रातर्फे घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे पारितोषिक वितरण सोलापूरकर यांच्या हस्ते झालं त्यावेळी ते बोलत होते.

**<u>पुणे विमानतळ</u>**

पुणे विमानतळावरील उन्हाळी सुटीचा हंगाम कालपासून सुरु झाला असला तरी यंदाच्या हंगामात प्रवाशांच्या सेवेसाठी उड्डाणाची संख्या मात्र फारशी वाढलेली नाही. यावेळी सुटीच्या हंगामासाठी पुण्यातून कोलकत्ता, सुरत आणि जयपूर या तीन शहरांसाठी प्रत्येकी एक अतिरिक्त उड्डाण होणार आहे. पुण्याच्या लोहगाव विमानतळावरील विमान उड्डाणे नियंत्रित करणाऱ्या यंत्रणेतील काही त्रुटींमुळं यंदाच्या हंगामात विमान उड्डाणाची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढवता येत नसल्याचं अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आलं.

**<u>महामेट्रो</u>**

दरम्यान पुण्यातील महामेट्रोच्या रामवाडी स्थानकापासून लोहगाव विमानतळापर्यंत नव्यानं सुरु करण्यात आलेल्या पीएमपीएमएलच्या वातानुकूलित बस सेवेला प्रवाशांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याचं निदर्शनास आलं आहे. त्यामुळं आणखी काही काळ वाट बघून या मार्गाचा फेरआढावा घेण्याचा निर्णय पीएमपीएमएल प्रशासनानं घेतला आहे.

**मका लागवड**

पुणे जिल्ह्यात बारामती, इंदापूर तालुक्यात मका लागवडींवर अमेरिकन लष्करी अळीचा प्रादुर्भाव काही प्रमाणात दिसत आहे. या रोगामुळे मक्याची गुणवत्ता घसरत असून चारा पिकामध्ये उत्पादनात घट येणार आहे. कीड नियंत्रणात आणण्यासाठी प्रत्येक शेतकऱ्याने दर दोन दिवसांनी मका पिकाचे निरीक्षण करून उपाय योजनांचा एकात्मिक पद्धतीने अवलंब करावा असं आवाहन पुणे कृषी विभागानं केलं आहे.

**गोलंदाजांचा शोध**

महाराष्ट्र क्रिकेट संघटनेने वेगवान गोलंदाजांचा शोध घेण्यासाठी अनोखी मोहीम हाती घेतली होती. या मोहिमेअंतर्गत सहा वेगवान गोलंदाजांना शोधण्यात यश आले आहे. गहुंजे इथल्या महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या मैदानावर महाअंतिम फेरी पार पडली.

विश्वजित ठाकूर, हर्षल मिश्रा, सार्थक छबीलवाड, रुद्रेश टपरे, ईशा घुले, नेहा सिंह या गोलंदाजांची निवड झाली असून त्यांना महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या वतीने वर्षभर मोफत प्रशिक्षण दिले जाणार आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल ३९ तर किमान २0 पूर्णांक 3 दशांश अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू संध्याकाळी ६ वाजता, विविध भारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू संध्याकाळी ०६.०० वाजता, विविध भारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**